महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०१६

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण १७, १९३८ (शके)

(१)	**आदिवासी विकास मंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**
(२)	**उद्योग व खनिकर्म मंत्री**	
(३)	**उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**	
(४)	**सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**	
(५)	**सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री**	

प्रश्नांची एकूण संख्या - ५१

तिल्लोरी (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील आश्रमशाळेत व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थिनींना होणारा त्रास

(१) * ६७७३२ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिल्लोरी (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील आदिवासी मुलींसाठी असलेल्या निवासी आश्रमशाळेत व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराच्या व मुलींचा मानसिक व शारीरिक छळ केल्यासंदर्भातील तक्रारी असून त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारींची दखल घेतली जात नसल्याने येथील विद्यार्थींनी व त्यांचे पालकांनी आदिवासी विकास आयुक्तालयासमोर ४ दिवस उपोषण केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात दोषी आढळणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) शाळेच्या व्यवस्थापनाविषयी तक्रार प्राप्त आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी प्रकल्प स्तरावरुन चौकशी करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने आयुक्तालयात दिनांक १५.१०.२०१६ रोजी सुनावणी घेऊन शालेय व्यवस्थापन व कर्मचारी यांना अंतर्गत मतभेद विसरुन सामंजस्याने शालेय कामकाज चालविण्याबाबत ताकीद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे रुईखेड टेकाळे (जि. बुलढाणा) येथील रोहीत्र आठ महिन्यांपासून बंद असल्याबाबत

(२) * ७०२४० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रुईखेड टेकाळे (ता.जि.बुलढाणा) येथील अनेक रोहीत्रे माहे फेब्रुवारी, २०१६ अखेर पासून बंद असल्याने वीजेअभावी शेतक-यांना पिकांना पाणी देणे अशक्य झाल्याची बाब माहे ऑगष्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबींची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, मौजे रुईखेड टेकाळे येथील रोहीत्रे नव्याने कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) दि.२८ फेब्रुवारी, २०१६ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा उपविभागाअंतर्गत बुलढाणा तालुक्यातील मौजे रुईखेड टेकाळे वा आसपासच्या परिसरातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर चक्रीवादळ व पाऊस झाल्याने उच्चदाब व लघुदाब विद्युत वाहिनीचे खांब व तारा तुटून विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. या गावातील कृषीपंपाना विद्युत पुरवठा करणा-या वाहिनीवरील एकूण ९ रोहित्र, खांब तुटून पडल्यामुळे बंद पडले होते. ते चालू करण्यात आले आहेत. कृषीपंपाना विद्युत पुरवठा करणा-या वाहिनीवरील नवीन ४१ खांब उभे करुन, उच्चदाब विद्युत वाहिनीच्या एकूण १२ गाळ्यांमधील व लघुदाब वाहिनीच्या एकूण ८६ गाळ्यांमधील तुटलेल्या तारा जोडून कृषीपंपाचे सर्व ९ रोहित्रे टप्प्याटप्प्याने चालू करण्यात आले आहेत.

(३) मौजे रुईखेड टेकाळे येथे तीन ६३ के.व्ही.ए.रोहित्रांची क्षमता वाढवून १०० के.व्ही.ए.करण्यात आलेली आहे. तसेच दोन ६३ के.व्ही.ए.चे अतिरिक्त रोहित्र, एक पोल मंजूर करण्यात येऊन त्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड, आजरा व गडहिंग्लज या तीन तालुक्यातील गावांमधील डी.पी. आणि विद्युत खांब बदलून मिळण्याबाबत

(३) * ७११३० श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड, आजरा व गडहिंग्लज या तीन तालुक्यातील गावांमधील डी.पी. आणि विद्युत खांब बदलण्याची मागणी मा.उर्जा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी व तत्पूर्वी अनेक वेळा करुनही सदर तीन तालुक्यातील डी.पी. खांब बदलण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे तुडये (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील महाराष्ट्र वीज वितरण कंपनीचे सबस्टेशन बंद असल्याने सदर परिसरात वीजपुरवठा कमी दाबाने होत असल्याने वीजपंप मोटारी मोठ्या प्रमाणात जळाल्या असून सदरचे बंद असलेले सबस्टेशन सुरु करण्याची मागणी मा.उर्जा मंत्री, विभागीय उपअभियंता, कोल्हापूर यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.
(२) मौजे तुडये (ता.चंदगड, जि. कोल्हापूर) येथील बंद असलेले सबस्टेशन सुरु करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे.
(३) ३३ के.व्ही. तुडीये या वाहिनीवरील ३३ केव्ही डिस्क इन्सुलेटर वारंवार निकामी होत असल्याने स्थानिक ठेकेदाराकडून टप्प्या टप्प्याने ५०० डिस्क इन्सुलेटर बदलूनही सदर वाहिनी कार्यान्वित न झाल्यामुळे संपूर्ण वाहिनीचे डिस्क इन्सुलेटर बदलण्याकरिता गडहिंग्लज विभागीय कार्यालयामार्फत निविदा प्रक्रियेचे काम प्रगतीपथावर असून लवकरच काम सुरु करण्यात येईल व डिसेंबर २०१६ अखेर काम पूर्ण करुन लवकरच ३३ केव्ही वाहिनी व ३३/११ केव्ही तुडीये उपकेंद्र कार्यान्वित येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमातील शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

(४) * ७१७१३ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमामधील शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटकातील (ई.बी.सी.) पावनेतीन हजार विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील ईबीसीपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १०२ संस्थामधील विद्यार्थ्यांची ८ कोटी, ५९ लाख रक्कम अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात प्रशासनाकडून काय कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) नाही.

(३) पुणे विभागातील एकूण १०२ संस्थांमध्ये सुमारे २८२९ विद्यार्थ्यांसाठी सुमारे रुपये ८.६० कोटी रकमेची मागणी सन २०१४-१५ साठी होती. त्यापैकी पडताळणीअंती एकूण ४९ संस्थांतील १६२६ विद्यार्थ्यांसाठी सुमारे रुपये ५.४६ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. उर्वरित ५३ संस्थांमधील १२०३ विद्यार्थ्यांची रक्कम सुमारे रुपये ३.१४ कोटी अगोदरच वितरीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील २०५ अनुदानित वसतिगृहांना
अनुदान मिळाले नसल्याबाबत

(५) * ६८१२६ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील २०५ अनुदानित वसतिगृहांना गेल्या दोन वर्षापासून शासनाचे अनुदान मिळाले नसल्यामुळे वसतिगृहातील मुलांची भोजन व निवासाची व्यवस्था करणे संस्थाचालकांना कठीण झाले असून मागील तीन वर्षापासून घरभाडे भत्त्याचे अनुदान देखील मिळालेले नसल्यामुळे अनेक वसतिगृह बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित वसतिगृहासाठी रु. ३० कोटींची मागणी केली असताना प्रत्यक्षात फक्त साडेतीन कोटी रुपये देण्यात आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतिगृहाचे थकीत अनुदान तसेच मागील तीन वर्षाचे घरभाडे भत्त्याचे अनुदान त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१), (२) व (३) नांदेड जिल्ह्यातील २०५ अनुदानित वसतिगृहांना सन २०१५-१६ वर्षातील प्रलंबित अनुदान तसेच सन २०१६-१७ या चालू वर्षातील अनुदान अदा करण्यासाठी रु.२८.४३ कोटी एवढी आवश्यकता होती. सन २०१६-१७ या वर्षात सदर वसतिगृहांसाठी रु. १९.४८ कोटी तरतूद प्राप्त झाली असून त्यातून सदर वसतिगृहांचे सन २०१५-१६ मधील प्रलंबित व सन २०१६-१७ चे ६० टक्के परिपोषण अनुदान तसेच सन २०१६-१७ मधील माहे एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीचे कर्मचारी मानधन अदा करण्यात आले आहे. उर्वरीत रकमेतून सदर वसतिगृहांच्या सन २०१३-१४ ते आजपर्यंत प्रलंबित असलेले इमारत भाडे अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, उर्वरीत अनुदानाच्या पूर्ततेसाठी सन २०१६-१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील वीज वाहक टॉवरसाठी शेतक-यांना जमिनीचा मोबदला मिळत नसल्याबाबत

(६) * ७१२२२ श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातून वीज वाहक टॉवर लाईनची कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात आली असून त्यामध्ये पंढरपूर, माळशिरस तालुक्यातील सुस्ते, अंजनसोंड, देगाव, तारापूर, आढीव, गुरसाळे, मेंढापूर, चिलाईवाडी, व्होळे, खेडभोसे, पट-कुरोली, आवे, तरटगाव, नांदोरे, कान्हापुरी, नेवरे आदि गावामधील शेतक-यांच्या जमीनीमधून विविध कंपन्याचे १३२ के.व्ही.ए. क्षमतेचे मोठे टॉवर उभे केलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावामधील शेतक-यांना विश्वासात न घेतल्यामुळे व बाधित जमिनींचा मोबदला मिळणेसह इतर मागण्यासंदर्भात पंढरपूर तहसिल कार्यालयासमोर स्थानिक शेतक-यांनी आंदोलने केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, उक्त चौकशीच्या निष्कर्षानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय, हे खरे आहे.

पंढरपूर व माळशिरस तालुकयामध्ये पॉवरग्रीड कॉर्पोरेशन व एनटीपीसी लिमिटेड या कंपन्यांचे १३२ के.व्ही. क्षमतेचे टॉवर उभे करण्यात आलेले आहेत.

(२) यासंदर्भात विविध शेतकरी संघटनांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना निवेदने दिली होती. त्यानुषंगाने दिनांक ०३.१०.२०१६ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये श्री.रामचंद्र गायकवाड व इतर सदस्य तसेच पॉवरग्रीड व एनटीपीसी कंपनीचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. बैठकीमधील सर्व उपस्थित अधिकारी/कर्मचारी व निवेदनकर्ता यांच्या मागणीप्रमाणे व नियमान्वये चर्चेअंती जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी ऊर्जा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०२१०/प्र.क्र.२९/ऊर्जा-४, दिनांक ०१.११.२०१० अन्वये शेतकऱ्यांना मोबदला देण्याच्या सूचना संबंधीत विभागास दिल्या व बैठकीस उपस्थित संघर्ष समिती सदस्यांनी त्यास मान्यता दिली. त्यानुसार पॉवरग्रीड व एनटीपीसीचे अधिकारी यांना कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात सिंथेटीक यार्नप्रमाणे आयात कापडावर कर आकारण्याबाबत

(७) * ६७६८८ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी, मालेगांव, इचलकरंजी आणि धुळे शहरातील यंत्रमाग व्यवसायाला मंदीतून बाहेर काढण्यासाठी सिंथेटीक यार्नवर आकारण्यात येणाऱ्या कराप्रमाणे कर आकारण्याबाबत व निर्यातीतून व्यापाऱ्यांना लाभ होण्यासाठी निर्यात दरात घट करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व, यंत्रमाग व्यावसायिक,

संस्था व संघटना यांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री, मा. वस्त्रोद्योग मंत्री व मा. वस्त्रोद्योग राज्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सिंथेटीक यार्नवर लावण्यात येणारी एण्ट्री डम्पिंग डयुटी व सुती कापडाच्या निर्यातीवर आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त दरामुळे यंत्रमाग व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनानुसार उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. सुभाष देशमुख : (१) होय.

(२) हे खरे नाही. परंतु एण्ट्री डम्पिंग डयुटी भारतात होणाऱ्या कृत्रिम धाग्याच्या किंमतीचे संतुलन कायम ठेवण्याकरीता लावण्यात येते.

(३) ॲन्टी डम्पिंग डयुटी व निर्यात कर या बाबी केंद्रशासनाच्या अख्यत्यारितीत येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या गोदामात हजारो क्विंटल तांदूळ विनावाटप असल्याबाबत

(८) * ६६४८० श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) केंद्राच्या आधारभूत भात खरेदी योजने अंतर्गत राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ कार्यालयाने सन २००९ ते २०१६ या दरम्यान शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला रु. ३५ कोटींचा दोन लाख १७ हजार क्विंटल तांदुळ ७८ गोदामात ठेवला असून मागील सहा वर्षात शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला सदर ३४ हजार क्विंटल तांदूळ सरकारने अजूनही विकलेला नसल्यामुळे निम्याहून अधिक तांदुळ कुजला असल्याची बाब एप्रिल-मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) अंशत: खरे आहे.

हंगाम २००९-१० ते २०१५-१६ मध्ये हंगामनिहाय ३,१७,०२१.२१ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आलेली आहे. त्यापैकी १,३०,५३६.०४ क्विंटल धानाची भरडाई झाली असून विना भरडाई शिल्लक राहिलेल्या १,८६,४८५.४७ क्विंटल धानापैकी २४३२३.६३ क्विंटल ही धानातील घट असून ७०,८१८.०५ क्विंटल धान ई-निविदा/ ई-लिलावाव्दारे विक्री करण्यात आली आहे. पुस्तकी साठयानुसार ९१,३४३.७९ क्विंटल धान ६० गोदामात शिल्लक असून पैकी हंगाम २०१५-१६ चा २७६७२.९६ क्विंटल साठा वगळता उर्वरित ६३६७०.८३ क्विंटल साठा ई-निविदा/ ई-लिलावाव्दारे जिल्हाधिकारी यांचेकडून विक्रीची कार्यवाही करण्यात येत आहे.

परंतु, सन २००९-१० मधील वाशिंद गोदाम मधील अंदाजे २०० क्विंटल धान सद्यस्थितीत काळा झाला असून त्या अनुषंगाने गोदामांच्या तपासणीचे काम सुरु आहे.

(२) खरेदी झालेल्या धानाची भरडाई करुन तांदुळ भारतीय अन्न महामंडळाचे गोदामात विहित मुदतीत जमा करण्यात येतो. मुदतीनंतर भरडाई विना शिल्लक धान, केंद्रिय साठयातून वगळण्यात आलेला धान जिल्हाधिकारी यांचे कडून ई-निविदा पध्दतीने विक्री करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुरडे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील बौद्धवस्तीसाठी विकासकामांना पुरेसा निधी मिळत नसल्याबाबत

(९) * ७०८०३ श्री.संजय कदम (दापोली) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरडे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील बौद्धवस्तीसाठी विकासकामांना पुरेसा निधी मिळत नसल्यामुळे येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा.सामाजिक न्याय मंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनात सार्वजनिक नळ पाणी पुरवठा योजना, बौद्धवाडी ते विहिरीपर्यंतचा रस्ता, गावदेवी मंदिर ते बौद्धवाडी रस्ता, मुरडे बौद्धवाडी ते स्मशानभूमी पर्यंत संरक्षक भिंत बांधणे अशा आवश्यक कामांचा समावेश असून या कामांना अग्रक्रमाने निधी मिळणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामांसाठी अंदाजे ४८ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असून सदर बौद्धवस्तीच्या विकासासाठी शासन निधी उपलब्ध करून देणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) होय.

(२) या बाबी सदर निवेदनात नमूद आहेत.

(३) व (४) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजनेच्या सन २०१३-१४ च्या बृहत आराखडयानुसार मौजे मुरडे, ता.खेड, जि.रत्नागिरी या गावाची लोकसंख्या २०० असल्यामुळे योजनेच्या निकषानुसार सदर वस्तीचा विकास करण्याकरीता रु.१५ लक्ष अनुज्ञेय आहेत. बृहत आराखडयाच्या वेळी सदर वस्तीकरीता रु.३.८६ लक्ष इतकी रक्कम प्रदान करण्यात आली असल्याने योजनेच्या निकषानुसार उर्वरित रु.११.१४ लक्ष इतक्या निधीबाबत आवश्यक ती कार्यवाही जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे स्तरावर करण्यात येईल.

बेडीसगाव-वाघिणीवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) या आदिवासी वाडयांसाठी रस्ता नसल्यामुळे दळणवळणाची गैरसोय होत असल्याबाबत

(१०) * ६६१२३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेडीसगाव-वाघिणीवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) या आदिवासी वाडयांसाठी रस्ताच नसल्यामुळे आदिवासींची दळणवळणाची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलदलित जमिनीवर वसलेल्या या आदिवासी वाडीच्या सभोवताली वनजमीन असल्यामुळे वन खात्याच्या जाचक अटींमुळे रस्ता बांधण्यात अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) तसेच वाघिणीवाडी ते बेडीसगाव दरम्यान असलेल्या ओढयावर साकव नसल्यामुळे आदिवासींना वाघिणीवाडी ते बेडीसगाव जाण्यासाठी दीड तासांचा कालावधी लागतो, हे खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बेडीसगाव ते वाघिणीवाडी येथे साकव व रस्ता बांधण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही. याबाबत कोणतेही निवेदन जिल्हा परिषदेस प्राप्त नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) बेडीस गाव ते वाघिणीवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १ असून त्याची एकूण लांबी ४.१० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/६०० डांबरी पृष्ठभाग १/६०० ते २/०० खडीपृष्ठभाग व उर्वरीत २/०० ते ४/०० कि.मी. पर्यंत रस्ता हा पाऊलवाटेचा आहे.

सदर रस्त्याचे काम जिल्हा नियोजन समिती रायगड यांच्याकडे सन २०१६-१७ कार्यक्रमांतर्गत मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.

आदिवासींच्या प्रलंबित विविध मागण्यांबाबत

(११) * ६५२३२ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी वसतिगृहांची संख्या आणि क्षमतेत भरीव वाढ करणे व वसतिगृहात सर्व पायाभूत सुविधा देणे, विद्यार्थ्यांना मिळणारा निर्वाह भत्ता

नियमित अदा करणे, आदिवासी व देवस्थान शेतकऱ्यांचे प्रश्न, खोट्या दाखल्याच्या आधारे आदिवासींच्या सवलती उपभोगणाऱ्यांच्या शोधासाठी विशेष मोहीम राबविणे इत्यादी मागण्यांच्या पूर्ततेसाठी किसानसभेच्या हजारो कार्यकर्त्यांनी दिनांक २ व ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.आदिवासी विकासमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासीच्या उक्त प्रलंबित मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्य किसान सभेने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नासंदर्भात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मा.मंत्री (आदिवासी विकास) यांच्या वाडा, जि.पालघर येथील निवासस्थानी दि.०३.१०.२०१६ रोजी आंदोलन केले होते. सदर आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी आंदोलनकर्त्या प्रतिनिधींची प्रत्यक्ष ठिकाणी भेट घेऊन किसानसभेने दिलेल्या निवेदनातील मुद्यांबाबत चर्चा केली. त्यानुषंगाने निवेदनातील मुद्यांबाबत विचारविनीमय करण्यासाठी किसान सभेचे पदाधिकारी व संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत दि.०७.१०.२०१६ रोजी मा.मंत्री (आदिवासी विकास) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक घेण्यात आली. निवेदनातील मागणीबाबत करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये “पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंयोजना” सुरू केली आहे. तसेच वसतीगृहातील सुविधा व निर्वाहभत्ता नियमित देण्याबाबत प्रकल्प अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

वनहक्क कायद्यांतर्गत तरतूदीचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दि.११.११.२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सुस्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

पडकई विकास योजनेंतर्गत जमीन सपाटीकरणाची कामे केलेल्या आदिवासी शेतकऱ्यांना कामाची रक्कम जिल्हा योजनेतून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अंगणवाड्यांना स्वस्त धान्य दुकानातून अन्न धान्य देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

याव्यतिरिक्त अन्य मागण्यांबाबत उपरोक्त बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार उचीत कार्यवाही करण्याबाबत दि.०५.११.२०१६ रोजीच्या शासन पत्रानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

(३) कार्यवाहीस विलंब झालेला नाही.

कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यात शेतकऱ्यांना ऊसाचा हमी भाव वाढवून देण्याबाबत

(१२) * ६७८८५ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस दर वाढवून मिळावा या मागणीसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊसाचा उत्पादन खर्च वाढला असल्यामुळे ऊसाचा दर एफआरपी पेक्षा अधिक दिल्याशिवाय कारखाने सुरू न करू देण्याच्या आंदोलकांच्या भूमीकेमुळे ऊसाची परराज्यात विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऊसाचा हमीभाव वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) अंशत: खरे आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसदर वाढवून मिळावा या मागणीसाठी कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात आंदोलन करण्यात आले असून सातारा जिल्ह्यात आंदोलन झाल्याचे दिसून आले नाही.

(२) आंदोलकांच्या भूमीकेमुळे ऊसाची परराज्यात विक्री होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) राज्यात ऊसाला हमीभाव लागू नाही. केंद्र शासनामार्फत प्रत्येक हंगामाकरीता ऊसाला भाव (FRP) जाहीर करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आश्रमशाळातून विद्यार्थ्यांची होणारी गळती

(१३) * ६५५१० डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये सन २०११-१२ मध्ये २.०७ लाख विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता मात्र सन २०१४-१५ मध्ये या संख्येत घट होऊन ती १.९६ लाख इतकी संख्या झाल्याचे निदर्शनास आले असून राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शासनाने १ हजार ७३० कोटी रुपये खर्च करुनही आश्रमशाळांमध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील आश्रमशाळांमध्ये हिंदी, गणित, विज्ञान आणि समाजविज्ञान अशा अनिवार्य विषयांसाठी शिक्षकच नसल्याची बाब कॅगच्या अहवालातून समोर आली असून माहे मार्च, २०१५ अखेरपर्यंत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक योजना आणि इतर कार्यासाठीचा निधीही या विभागाकडे अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन वरील विषयांसाठी शिक्षकांच्या नियुक्त्या तात्काळ करणार आहे काय तसेच विद्यार्थ्यांच्या कमी होत असलेल्या संख्येची चौकशी करणार आहे काय व अखर्चित राहिलेल्या निधीबाबत संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

अपर आयुक्त, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर यांच्या अधिनस्त शासकिय आश्रमशाळांसाठी माध्यमिक शिक्षक संवर्गातील एकुण १८३१ पदे मंजूर असून त्यापैकी १४४३ पदे भरलेली असून ३८८ पदे रिक्त आहेत. तथापी अनिवार्य विषयांसाठी शिक्षक नसल्याबाबत कॅगच्या अहवाल प्राप्त नाही.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या विविध शैक्षणिक योजना व इतर कार्यासाठीचा निधी अखर्चित राहीलेला नाही.

(३) व (४) शिक्षक संवर्गाचे नियुक्ती प्रधिकारी संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास हे असून सदर संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत त्यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. मात्र अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अधिनस्त पेसा क्षेत्रातील पदभरती बाबत मा. उच्च न्यायालयाने दि. १५/५/२०१५ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण, गणवेश व शालेय साहित्य पुरविले जात असल्याने आदिवासी पालक प्रामुख्याने इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी स्थानिक शाळांना प्राधान्य देत आहेत. तसेच नामांकित शाळा योजनेंतर्गत प्रवेशक्षमता सन २०१५-१६ पासून प्रतिवर्ष २५००० विद्यार्थी केली आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या १४ एकलव्य निवासी शाळांतून इ. ६ वी ते १२ वीत एकूण २४३५ आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामुळे शासकिय आदिवासी आश्रमशाळांतील काही विद्यार्थी वरील शाळांमध्ये प्रवेश घेत आहेत.

आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था व दत्त दिगंबर नागरी सहकारी पतसंस्थांच्या गैरव्यवहाराची चौकशी करुन ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत

(१४) * ६९५३८ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था, कोरेगाव (ता.कोरेगाव, जि.सातारा) या संस्थेच्या चेअरमन व व्यवस्थापक यांनी संस्थेचे रकमेचा अपहार केल्याने संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिनाथ पतसंस्था व दत्त दिगंबर पतसंस्था यांच्या कारभाराची चौकशी करण्याची व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यासाठी दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास ठेवीदारांनी मा. सहकार मंत्री, सहकार आयुक्त, पुणे, मा. जिल्हा उपनिबंधक, सातारा यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीनुसार आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था व दत्त दिगंबर नागरी सहकारी पतसंस्था यांच्या चेअरमन व व्यवस्थापकांची चौकशी केली काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) अंशतः खरे आहे,

संस्थेच्या ९ संचालकांपैकी ८ संचालकांनी राजीनामे दिल्याने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांच्या दि. २६.०३.२०१३ रोजीच्या आदेशान्वये चार सदस्यीय प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्थेकडून ठेवी मिळत नसलेबाबत तक्रारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. मात्र दत्त दिगंबर पतसंस्थेबाबत अशा तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) व (४) आदिनाथ सहकारी पतसंस्थेच्या सन २०१३-२०१५ या कालावधीतील वैधानिक लेखापरिक्षणाच्या विशेष अहवालातील मुद्यांच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यात आलेली आहे. मात्र सदर चौकशीत कोणतेही गंभीर मुद्दे आढळून आले नसल्याने संबंधितांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

(५) आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. कोरेगांव या संस्थेचे श्री. दत्त दिगंबर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सातारा या पतसंस्थेत दि. ३१.०१.२०१६ रोजी विलीनीकरण झाले आहे. विलीनीकरणाच्या करारामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याची कार्यवाही चालु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

टेम्बुसोंडा (ता.चिखलदरा,जि.अमरावती) येथील आश्रमशाळेमध्ये मुलींकरीता एकच अधिक्षिका असल्याबाबत

(१५) * ६८४१६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेम्बुसोंडा (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील आदिवासी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक निवासी कन्या आश्रमशाळेमध्ये ६७१ मुलींकरीता एकच अधिक्षका असून शाळेच्या प्रवेशद्वारावर चौकीदार नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मुख्याध्यापक व शिक्षक मुख्यालयात न रहाता अमरावती येथून येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, मुलींच्या सुरक्षिततेसाठी आणखी एक अधिक्षिका व चौकीदार नियुक्त करण्याबाबत तसेच शाळेत शिस्त राखण्यासाठी येथील मुख्याध्यापक व शिक्षक मुख्यालयात रहावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) अंशत: खरे आहे.

शासकिय आश्रमशाळा, टेंब्रुसोंडा येथे अधिक्षकेचे एकच पद आकृतीबंधानुसार मंजूर असून सदर पद भरलेले आहे.

सदर आश्रमशाळेसाठी चौकीदाराचे एक पद मंजूर असून सदर पदावरील कर्मचारी रजेवर असल्याने त्याची जबाबदारी वर्ग-४ च्या अन्य कर्मचा-यांकडे आळीपाळीने देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

शासकिय आश्रमशाळा, टेंब्रुसोंडा येथे ७ शासकिय निवासस्थाने उपलब्ध आहेत. त्यामुळे मुख्याध्यापक, पुरुष अधिक्षक व स्त्री अधिक्षिका ह्या शाळा परिसरातच राहतात तर उर्वरित शिक्षक व कर्मचारी त्याच गावात राहतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) शासकिय आश्रमशाळा, टेंब्रुसोंडा येथे अधिक्षकेचे एकच पद आकृतीबंधानुसार तेथील विद्यार्थीसंख्या लक्षात घेऊन तेथील स्त्री शिक्षिका अधिक्षिकेला कामात मदत करत आहेत. तसेच नियमित चौकीदाराची जबाबदारी वर्ग-४ च्या अन्य कर्मचा-यांकडे आळीपाळीने देण्यात आली आहे.

सदर शाळेत ७ शासकिय निवासस्थाने उपलब्ध आहेत. त्यामुळे मुख्याध्यापक, पुरुष अधिक्षक व स्त्री अधिक्षिका ह्या शाळा परिसरातच राहतात तर उर्वरित शिक्षक व कर्मचारी त्याच गावात राहतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर) येथील खेड मार्गावर असलेल्या वखार महामंडळाच्या गोदामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(१६) * ६९५३२ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जिल्हा चंद्रपूर) येथील महाराष्ट्र वखार महामंडळाचे गोदामातून चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा या तीन जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकांनाना धान्याचा पुरवठा केला जात असून या गोदामातून २३ लाख ४० हजार रुपये किमंतीचा ८५.४० मेट्रीक टन तांदूळ आणि २६ लाख ९५ हजार रुपये किमंतीचा १४८.९६ मेट्रीक टन गहू अशा एकूण ५० लाख ३६ हजार रुपये किमंतीच्या २२८.७६ मेट्रीक टन धान्य साठ्याची अफरातफर केली असल्याची माहिती दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीबीआयच्या अधिका-यांनी सदर गोदामामध्ये छापा टाकून येथील भांडारपाल श्री यशवंत भुरे यांना अटक केली असून श्री.पंकज कांचन जगदाडे फरार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले आणि संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) अंशत: खरे आहे.

(२) सीबीआयच्या अधिका-यांनी ब्रम्हपुरी गोदामामध्ये छापा टाकून तेथील भांडारपाल श्री.यशवंत भुरे यांना अटक केली हे खरे नाही.

वखार महामंडळाच्या गोदामातील साठयाची गोदामनिहाय मोजदाद करण्यात आली. तपासणीमध्ये गहू व तांदूळाची पोती कमी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे श्री.यशवंत भुरे व श्री. पंकज जगदाळे यांचेविरुध्द विभागीय व्यवस्थापक नागपूर विभाग यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यामुळे श्री.भुरे यांना अटक केली आहे. श्री. जगदाळे यांचा जामीन कनिष्ठ न्यायालयाने नामंजूर केला होता, तथापि मा. उच्च न्यायालयाने क्रिमिनल ॲप्लिकेशन (ABA) नं. ७२०/२०१६ प्रकरणी दि.२६.१०.२०१६ रोजी अंतरिम जामीन मंजूर केला आहे.

(३), (४) व (५) वखार महामंडळाने श्री.यशवंत भुरे व श्री. पंकज जगदाळे यांना अनुक्रमे दि.१५.१०.२०१६ व दि.०७.०५.२०१६ रोजी निलंबित केले असून त्यांची खातेनिहाय चौकशीही सुरु केली आहे. खातेनिहाय चौकशीनुसार फौजदारी गुन्हा प्रकरणी मा. न्यायालय आदेश देईल त्याप्रमाणे त्वरित कारवाई करण्यात येईल.

राज्यातील अनेक विद्युत प्रकल्प बंद असल्याबाबत

(१७) * ६८२८० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळा संपल्यानंतर राज्यात विजेची मागणी वाढत असून आजच्या परिस्थितीत १९८०० मेगावॅट वीजेची आवश्यकता असताना सुध्दा दुर्गापूर, खापरखेडा, कोराडी, भुसावळ, परळी या विद्युत केद्रांत अल्प प्रमाणात विद्युत निर्मिती सुरु असल्याची माहिती दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खापरखेडा व कोराडी विद्युत केंद्राच्या नुतनीकरणावर महाजनकोनी करोडो रुपये खर्च करुन अद्ययावत यंत्रसामुग्री बसविलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुतनीकरण केल्यानंतरसुध्दा महाजनकोतील अधिका-यांच्या दिरंगाईमुळे खापरखेडा विद्युत प्रकल्प बंद ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यामध्ये विजेची मागणी लक्षात घेता व वीज ग्राहकांना २४ तास वीज उपलब्ध होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

खापरखेडा विद्युत केंद्रातील कोणत्याही संचाचे नूतनीकरणाचे काम अद्याप हाती घेतलेले नाही.

कोराडी विद्युत केंद्रातील संच क्र.६ चे नूतनीकरणाचे काम मे.भेल (BHEL) यांचे मार्फत हाती घेण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सन २०१९-२० पर्यंत वीजेची संभाव्य मागणी लक्षात घेऊन महावितरण कंपनीने केंद्रीय विद्युत निर्मिती केंद्र, राज्य वीज निर्मिती केंद्र तसेच खाजगी वीज निर्मिती केंद्र यांच्यासोबत वीज खरेदी करार केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनियमित वीज पुरवठा होत असल्याबाबत

(१८) * ६९२४८ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील वीज वितरण कंपनीच्या अनियमित कारभारामुळे शेतकऱ्यांना संपूर्ण दिवसात केवळ तीन ते चार तासच अनियमितपणे वीज मिळत असल्याने पिकांना पाणी देता येत नाही म्हणून खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन येथील वीजेचे अघोषित भारनियमन कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

परंतु बुलढाणा जिल्ह्यातील ३३ के.व्ही.हतेडी उपकेंद्र अंतर्गत शेतकऱ्यांना १२ तास वीज पुरवठा देण्याबाबत महावितरण कंपनीकडे मागणी करण्यात आली होती.

(२) यासंदर्भात तांत्रिक बाबींची तातडीने तपासणी करण्यात आली व ३३ के.व्ही. हतेडी उपकेंद्र (सिंगल फेजिंग) माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये अतिभारीत झाल्यामुळे सदर उपकेंद्रावरील काही भार हा नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या सागवन उपकेंद्रावर टाकण्यात आला व काही भार हा रायपुर उपकेंद्रावर वळती करुन तसेच हतेडी उपकेंद्रातील सी.टी.चे करंट सेंटिंग वाढवून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यात पायाभूत सुविधा योजना इन्फ्रा २ अंतर्गत नवीन वीज उपकेंद्रे उभारण्याबाबत

(१९) * ६८२७९ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात वीजेसंदर्भात पायाभूत सुविधा योजनेंतर्गत इन्फ्रा २ अंतर्गत जिल्ह्यात ५ वीज उपकेंद्रे उभारली जाणार होती मात्र गेल्या दीड वर्षाच्या काळात त्यापैकी केवळ एकच उपकेंद्र उभारण्यात आले असून इतर कामे प्रलंबित असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इन्फ्रा २ च्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध ठिकाणी १०५० रोहित्र बसवण्यात येणार होती त्यापैकी ५५७ रोहित्रांची कामे बाकी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार शासनाने येथील वीज उपकेंद्राच्या कामाला गती देण्यासोबतच प्रलंबित रोहित्रांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) व (३) पायाभूत आराखडा-२ योजनेचे वाशिम जिल्ह्याचे काम टी-७८ या निविदेद्वारे मे.कस्तुम इंजिनिअर्स यांना दि. ६.९.२०१४ रोजी देण्यात आले. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी २ वर्ष असून दि. ५.९.२०१६ रोजी संपला आहे. माहे ऑक्टोबर, २०१६ पर्यंत सदर कंत्राटदाराने ५ उपकेंद्रापैकी १ उपकेंद्र, ८ अतिरिक्त रोहित्रापैकी ५ अतिरिक्त रोहित्रे, १०५० वितरण रोहित्रांपैकी ५०० रोहित्रांचे काम पूर्ण केले आहे.

सदर कंत्राटदाराने मासिक उद्दिष्टानुसार काम न केल्यामुळे त्यांना २ वेळा नोटीस टु करेक्ट देण्यात आली आहे. तसेच माहे मार्च, २०१६ मध्ये रु. १८.७९ कोटी रुपयाची कामे त्यांच्याकडून काढून घेऊन मंडळ स्तरावर त्या कामाच्या निविदा काढून दुसऱ्या कंत्राटदाराना ते काम देण्यात आले असून सर्व कामे प्रगतीपथवर आहे. त्यानंतरही कामाची प्रगती समाधानकारक नसल्यामुळे आणखी रु.२८.५७ कोटी रुपयांची कामे ऑक्टोबर, २०१६ मध्ये काढून घेण्यात आली असून या कामाची निविदा काढण्याची प्रक्रिया मंडळ स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाची राजर्षी शाहू महाराज शुल्क प्रतिपूर्ती योजना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना लागू करण्याबाबत

(२०) * ६५५२३ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यसरकारने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शैक्षणिक सवलती आता वार्षिक उत्पन्न ६.०० लाख असलेल्या कुटुंबातील

मुलांनाही मिळण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शुल्क प्रतिपूर्ती योजना दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरूप काय आहे व चालू आर्थिक वर्षात राज्यातील किती विद्यार्थ्यांना वरील योजनेचा लाभ मिळणार आहे,

(३) असल्यास, या योजनेसाठी वार्षिक खर्च किती येईल व ही योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी ज्यांच्या पालकांचे उत्पन्न रुपये २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना व रुपये २.५० लाख ते रुपये ६.०० लाख पर्यंत आहे आणि ज्यांनी इयत्ता १० / १२ वी मध्ये ६० टक्के गुण प्राप्त केले आहेत अशा विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ चालू आर्थिक वर्षात सुमारे ५ लाखपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

(३) या योजनेसाठी सन २०१६-१७ साठी सुमारे रुपये ७५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदरहू योजनेच्या निर्णयाची अंमलबजावणी सन २०१६-१७ मध्ये शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी होणार आहे. त्याप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास विभागामार्फत नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी मुलांना प्रवेश न मिळाल्याबाबत

(२१) * ६७४२४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष

टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागामार्फत नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांची निवड करुन त्या शाळांमध्ये आदिवासी मुलांना प्रवेश देण्याची प्रक्रिया साधारणत: दर वर्षाच्या जूनमध्ये करावयाची असतानाही माहे ऑगस्ट, २०१६ अखेर राज्यातील बहुसंख्य आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालयामार्फत निवड करण्यात आलेल्या आदिवासी मुलांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ अखेरपर्यंत प्रवेश देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक विभागातील जवळपास निम्मे विद्यार्थी शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे प्रवेशापासून वंचित राहिले असून सन २०१५-१६ मध्ये इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा निवडीमध्ये शैक्षणिक शुल्क देताना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहारही झाल्याच्या तक्रारी निर्देशनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या मुलांना खास बाब म्हणून इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे तसेच उक्त गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही.

नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता राज्यस्तरीय सचिव समितीच्या दि.१३.०५.२०१६, दि.०१.०६.२०१६, दि.२८.०६.२०१६, दि.१८.०७.२०१६ व दि.०१.०८.२०१६ रोजी आयोजित ५ बैठकांमध्ये प्रस्तावांची तपासणी करून शाळांची निवड करण्यात आली. सदर बैठकांच्या इतिवृत्तानुसार निवड करण्यात आलेल्या शाळांमध्ये दि.०७.०८.२०१६ अखेर विद्यार्थी प्रवेशित करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

नामांकित शाळांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क अदा करण्यामध्ये गैरव्यवहार झाल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

उटंबर, पो.केळशी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे बॉक्साईडचे उत्खननामुळे आंबा व काजू पिकांचे नुकसान होत असल्याबाबत

(२२) * ७०८१९ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील (जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत उटंबर, पो.केळशी या गावात आशापुरा व सबकॉन्ट्रॅक्टर गुडेकर मायनिंग गेली १० वर्षे बॉक्साईडचे उत्खनन करत असल्याने उत्खननामुळे लाल मातीच्या प्रादुर्भावामुळे आंबा व काजूचा मोहर पडून बागायती शेतीचे नुकसान होत आहे व त्यामुळे शेतकऱ्यांनी सदर सुरु असलेले उत्खनन बंद करावे असे मागणी करणारे पत्र लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री व तत्कालीन खनिकर्म मंत्री तसेच पर्यावरण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पत्रातील मागणीच्या अनुषंगाने खनिकर्म विभागाकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्यामुळे पुन्हा लोकप्रतिनिधींनी मा.खनिकर्म मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये पत्र पाठवून याप्रकरणी तात्काळ कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) मौ.उटंबर, पो. केळशी ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे मे. आशापूरा माईनकेम लि. तर्फे गेली १० वर्षे बॉक्साईट खनिजाच्या उत्खननामुळे तेथील परिसरात शेतीला नुकसान होत असल्याचे दि. ०३/०३/२०१६ चे सन्माननीय वि.स.स. यांचे मा. मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित निवेदन प्राप्त झाले होते व त्यासंदर्भात संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचा दि. २७/०७/२०१६ चा अहवाल प्राप्त झाला आहे.

(२) सन्माननीय लोकप्रतिनीधी यांचे पुनश्च दि. २९/०८/२०१६ चे मा. मंत्री (खनिकर्म) यांना अग्रेषित निवेदन नुकतेच विभागास दि. १६/११/२०१६ रोजी प्राप्त झाले असून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रस्तुत विषयी प्राप्त अहवालानुसार मे. आशापुरा माईनकेम लि. यांचे मौ. उटंबर पो. केळशी, ता. दापोली येथे मंजूर खाणपट्टा अद्याप पर्यावरण विषयक मंजूरी अभावी सुरु झालेला नाही.

तथापि सदर परिसरापासुन ४ कि.मी. अंतरावर असलेल्या मौ. रोवले व मौ. उंबरशेत येथील मे. आशापुरा माईनकेम लि. यांच्या बॉक्साईट खनिजाच्या उत्खननामुळे पर्यावरण हानी होत असल्याबाबत या पुर्वी प्राप्त तक्रारी व विधान परिषदेतील उपस्थित लक्षवेधी सूचनेच्या आधारे जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना कृषी विभाग व प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे कडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल देणेबाबत कळवले होते. यासंदर्भात प्रदुषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीत पर्यावरण विषयक उपाययोजना पर्याप्त असल्याचे निष्कर्ष असून कृषी विभागाने या विषयी ऑक्टोबर-नोव्हेंबर व मार्च-एप्रिल या मोहोर येण्याची व फ़ळधारणेच्या अवस्थेत प्रत्यक्ष पहाणी करुन अहवाल देणे संयुक्तिक ठरेल असे मत दिल्याने तूर्तास सदर प्रकरणी अहवाल प्राप्त झाल्यावर वस्तुस्थितीच्या आधारे कार्यवाही करता येईल.

नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथे आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची झालेली दुरावस्था

(२३) * ६६७१२ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील नेरळ येथे आदिवासी विद्यार्थ्यांच्या मोडकळीस आलेल्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी आदिवासी विभागाने मंजूर केलेले रुपये ४ कोटी निधी विनावापर पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या अपूऱ्या सोईसुविधांबद्दल विद्यार्थी व पालकांमध्ये नाराजी असून त्यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच उक्त वसतिगृहातील असुविधा दूर करण्याचे दृष्टीने आणि वसतिगृहाचे नवीन बांधकाम त्वरित सुरु करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर वसतिगृहासाठी मंजूर झालेला निधी वापराविना पडून राहण्यामागची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह नेरळ येथील इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक २६.०१.२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देऊन रु. ३९९.०० लक्ष निधी वितरीत केला होता.

सदरचा निधी निविदा प्रक्रीया व अनुषंगीक कार्यवाही करुन मार्च, २०१६ अखेरपर्यंत खर्च होणे शक्य नसल्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांनी समर्पित केला आहे. सन २०१६-१७ या चालू आर्थिक वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागणी प्राप्त झाल्यावर आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात विशेष घटक योजनेतून मागासवर्गीयांसाठी देण्यात येणाऱ्या विहिरींमध्ये झालेला गैरव्यवहार

(२४) * ६७५२९ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट तालुक्यातील विशेष घटक योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या ४५० विहीरींच्या अनुदानाचे वाटप बिगर मागासवर्गीयांना करण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा.समाजकल्याण मंत्री यांचेकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर : (१) याबाबतची तक्रार जिल्हा परिषद सोलापूर कार्यालयात जून, २०१६ मध्ये प्राप्त झाली आहे.
(२) मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांच्या कार्यालयात तक्रार प्राप्त झाल्याचे आढूळन येत नाही.
(३) व (४) सदर प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त (विकास) यांच्यामार्फत तसेच पोलिस उपअधिक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, सोलापूर यांच्याकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाने ऊसासाठी ठिबक सिंचन प्रकल्प राबविणे शेतकऱ्यांना सक्तीचे केल्याबाबत

(२५) * ७०४०९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने ऊसासाठी ठिबक सिंचन प्रकल्प राबविणे शेतकऱ्यांना सक्तीचे केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सांगली जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी विरोध करून आपल्या मागण्याचे निवेदन मा. मुख्यमंत्री, मा. सहकार, पणन मंत्री यांच्याकडे दिनांक १८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवेदनाचे स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली केली वा करत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) नाही.
(२) सांगली जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतक-यांनी विरोध करून दिलेले मागण्याचे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, चेअरमन, क्रांतिअग्रणी सहकारी साखर कारखाना, कुंडल, जि. सांगली यांनी दिनांक २३/८/२०१६ रोजी व चेअरमन, रा. बा. पाटील सहकारी साखर कारखाना, राजारामनगर, सांगली यांनी दिनांक २५/८/२०१६ रोजी केलेले निवेदन प्राप्त झालेले आहे.

(३) सदरची निवेदने ऊस ठिबक सिंचन योजनेच्या तांत्रिक बाबी संदर्भात, अनुदानाचे मर्यादेबाबत व प्रकल्प तयार करणे इत्यादी बाबत आहेत.
(४) कृषी विभागाकडून ठिबक सिंचन राबविणेची कार्यवाही करणेत येत असल्याने सदरची निवेदने कृषी आयुक्तालयाकडे पाठविण्यात आलेली आहेत. ऊस ठिबक सिंचन योजनेचा प्रस्ताव तयार करण्याकरिता मा. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक ६ ऑक्टोंबर, २०१६ अन्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचे प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

हिंगोली जिल्हयात पं. दिनदयाल उपाध्याय योजनेअंतर्गत ४५ कोटी रुपयांचा निधी वीज कंपनीकडे प्रलंबित असल्याबाबत

(२६) * ६५२५९ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात पं.दिनदयाल उपाध्याय योजनेअंतर्गत जिल्हयात सात ठिकाणी वीज उपकेंद्र स्थापन करणे, जुनाट रोहित्र बदलून नवीन रोहित्र बसविणे, नवीन खांब उभे करुन नवीन वीज वाहिन्या जोडण्याचे काम करणे इत्यादी कामांसाठी ४५ कोटी रुपयांचा निधी वीज कंपनीकडे प्रलंबित असल्याची बाब माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्हयात दिनदयाल उपाध्याय योजनेतून देण्यात आलेल्या ४५ कोटी रुपयांच्या कामांच्या निविदा लवकरात लवकर काढून कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत हिंगोली जिल्हयासाठी आठ नवीन ३३ के.व्ही.उपकेंद्र स्थापन करणे, उच्चदाब व लघुदाब वाहिनी उभारणे, नवीन रोहित्र बसविणे इ. कामासाठी रु. ४०.८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

(२) दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेतील मंजूर नवीन उपकेंद्र, उपकेंद्र क्षमतावाढ, अतिरिक्त रोहित्र व त्या अनुषंगाने लागणारी उच्च दाब वाहिन्या या कामांची रु. १८.८३ कोटीची निविदा काढण्यात आली असून, कामाचा कार्यादेश (LOA) दि.२१.११.२०१६ रोजी देण्यात आला आहे. उर्वरित उच्चदाब/लघुदाब वाहिनी, वाहिनी विलगीकरण, नवीन रोहित्र उभारणी तसेच दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना वीज जोडणी देणे इ. कामांची रु. २०.२७ कोटीची निविदा दि. २६.९.२०१६ रोजी काढण्यात आली असून निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील २९ जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेतील कर्मचाऱ्यांना अनेक महिन्यांपासून वेतन मिळत नसल्याबाबत

(२७) * ६६१५३ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २९ जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेतील कर्मचाऱ्यांना गत १४ महिन्यांपासून व काही शाखांमध्ये तीन वर्षापासून वेतन मिळत नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांची आर्थिक गैरसोय होत असल्याची माहिती दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २९ जिल्हयातील भूविकास बँकांच्या जिल्हा शाखेत ४४ कोटी ४१ लाखांचे भागभांडवल असून तब्बल ६५.३५ कोटी रुपयांचे कर्ज येणे बाकी आहे व कर्ज वसूली पूर्णपणे बंद केल्याने सर्वच शाखेत अवसायक बसविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच कर्जवसूली होण्याच्या दृष्टीने आणि भूविकास बँक कर्मचाऱ्यांची वेतन देण्याच्या दृष्टीने शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) अंशत: खरे आहे.

(२) मार्च, २०१४ अखेर राज्यातील २९ जिल्हा भूविकास बँकाचे प्रचलित पध्दतीप्रमाणे सभासदांकडून रु.९४६.५४ कोटी व ओ.टी.एस. प्रमाणे रु.२३७.७३ कोटी कर्ज येणे बाकी होते. त्यापैकी, दि.३१.०३.२०१६ अखेर रु.१०.४४ कोटी वसूल झालेले आहेत. ओटीएस योजनेला दि.३१.०३.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

शासनाच्या दि.२४.०७.२०१५ रोजीच्या धोरणात्मक निर्णयानुसार शिखर भूविकास बँक व २९ जिल्हा भूविकास बँका अवसायनात घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

(३) राज्यातील २९ जिल्हा भूविकास बँकांपैकी २४ बँकांतील कर्मचाऱ्यांची थकीत वेतनाची अंदाजे रक्कम रु.४३.३८ कोटी इतकी असून सन २००८-२०१६ या कालावधीमध्ये शिखर बँकेने थकीत वेतनाकरिता रु.१४०.५२ कोटी अल्प मुदत कर्ज म्हणून उपलब्ध करुन दिले आहेत.

शासनाच्या दि.२४.०७.२०१५ च्या धोरणात्मक निर्णयानुसार भुविकास बँकांची कर्ज वसुली व मालमत्तेच्या विक्रीमधून उपलब्ध होणाऱ्या निधीतून कर्मचाऱ्यांची देणी भागविण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील महावितरणाच्या कंत्राटी कामगाराच्या वेतनाबाबत

(२८) * ६७०७४ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तीन वीज कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या राज्यभरातील ३२ हजार कंत्राटी कामगारांना गेल्या

पाच महिन्यांपासून वेतन देण्यात आलेले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणकडे असलेल्या १८ ते २० हजार कुशल, अर्धकुशल व अकुशल बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांना महावितरणच्या प.क्र. ५२६ नुसार अनुक्रमे १२६४९, १२१०६ व ११७६३ रुपये वेतन देणे कायद्यानुसार बंधनकारक असतानाही केवळ ४ ते ५ हजार वेतन देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बाह्यस्त्रोत कर्मचारी पुरविणाऱ्या एजन्सीला महावितरण ४ टक्के कमिशन देत असून त्यातून एजन्सीने प्रति कर्मचाऱ्यांना २०० रुपये पीएफ भरणे आवश्यक असताना तो भरला जात नसून त्यात कोट्यवधी रक्कमेचा गैरव्यवहार होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या महावितरणाच्या संबंधित अधिकारी व एजन्सी विरोधात कोणती कारवाई केली आहे

(५) तसेच गैरव्यवहाराची करोडो रुपयांची वसुली तसेच कर्मचाऱ्यांचा पीएफ जमा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) महावितरणच्या काही कार्यालयाच्या कंत्राटी कामगारांचे काही महिन्यांचे वेतन प्रलंबित असल्याचे दिवाळीपूर्वी निदर्शनास आले होते. कंत्राटी कामगारांची बिले कंत्राटदारामार्फत कार्यालयात सादर केल्यानंतर काही त्रुटींमुळे सदर बिले कंत्राटदारास परत करण्यात आली होती. सदर बिलांच्या त्रुटींची पूर्तता केल्यानंतर कंत्राटी कामगारांना देय असलेल्या एकूण रक्कमेची मागणी संबंधित कार्यालयामार्फत महावितरणच्या मुख्य कार्यालयास करण्यात आली. निधीच्या उपलब्धतेनुसार मुख्य कार्यालयामार्फत कंत्राटी कामगारांना देय असलेली रक्कम संबंधित कार्यालयास वर्ग करुन कंत्राटी कामगारांचे वेतन व बोनस दिवाळीपूर्वी अदा करण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली आहे.

महानिर्मिती व महापारेषण कंपन्यांच्या कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन नियमितपणे देण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्हयात ठक्कर बाप्पा योजनेत सन २००७-०८ ते सन २०१४-१५ या कालावधीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(२९) * ६५०८१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी गावांचा विकास जलदगतीने व्हावा याकरिता सन २००७-०८ पासून ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००७-०८ ते सन २०१४-१५ या कालावधीत जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या चार तालुक्यांमध्ये या योजनेतून करण्यात आलेली १,५८७ विकास कामे बोगस असून ती झाल्याचे कागदोपत्री दाखवून १०० कोटींपेक्षा अधिक रकमेचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये एका शासकीय संघटनेने निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(३) तसेच वाडा तालुक्यातील (जि.पालघर) खुडेद-घोडीचा पाडा मंगल कार्यालयाची इमारत न बांधता ठक्कर बाप्पा योजनेच्या १० लाख रुपयांच्या निधीत परस्पर गैरव्यवहार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द झाल्याने जव्हार आदिवासी विकास प्रकल्पातील निरीक्षक यांना निलंबित करुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा निर्णय आदिवासी विभागाचे अप्पर आयुक्त यांनी घेतल्याची माहिती दिनांक ७.१०.२०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग २ व ३ बाबत शासनाने काही चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द करावयाच्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, संपादक, साप्ताहिक शब्द मशाल यांना दिनांक १४/०९/२०१६ च्या पत्रान्वये चौकशी करण्याची मागणी केली आहे.

(३) होय. हे खरे आहे.

(४) संबंधित अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जि.पालघर, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, विक्रमगड, प्रकल्प कार्यालयातील आदिवासी विकास निरीक्षक, सरपंच, ग्रामपंचायत खुडेद व संबंधित ठेकेदार यांच्याविरुध्द विक्रमगड तालुक्यातील मौजे खुडेदपैकी घोडीचापाडा येथील मंगल कार्यालयाचे बांधकाम न करता शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी दिनांक ४/१०/२०१६ रोजी पोलीस ठाणे, विक्रमगड येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, जि.पालघर यांचेमार्फत (एफआयआर क्र.७१/१६) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) याबाबत पोलीस ठाणे विक्रमगड यांचेमार्फत सखोल तपास चालू आहे.

गोरेगांव फिल्मसिटी येथील आदिवासींच्या शेती पिकांचे फिल्मसिटीच्या संचालकांनी केलेले नुकसान

(३०) * ६६५०५ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव फिल्मसिटी येथील आदिवासी बांधवांच्या भातशेतीसह काकडी रोपांवर फिल्मसिटीच्या संचालकांनी माहे ऑगस्ट २०१६ मध्ये वा त्या दरम्यान बुलडोजर फिरवून शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्र प्रदेश आदिवासी युवा आघाडीचे प्रतिनिधींनी मा. आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे त्याचदरम्यान लेखी तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी बांधवांच्या शेती पिकांचे नुकसान झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले,

(४) तसेच याबाबत शासनाने आदिवासींना कोणते साहय केले आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

गोरेगाव चित्रनगरी परिसरातील जोकर मैदान या बाहयचित्रिकरण स्थळावर अनधिकृतरित्या करण्यात आलेल्या भात शेतीचे महामंडळाने दि.१०.०८.२०१६ रोजी पोलिस बंदोबस्तामध्ये निष्कासन केले.

(२) महाराष्ट्र प्रदेश आदिवासी युवा आघाडीचे प्रतिनिधींनी मा. आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे यासंदर्भात लेखी तक्रार केली नसल्याचे आदिवासी विकास विभागाने अवगत केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाटण (जि.सातारा) या डोंगरी तालुक्यातील विद्युत विकासाच्या प्रलंबित कामांना निधी उपलब्ध करून देणेबाबत

(३१) * **६६१६८ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीकडून राज्यातील डोंगरी तालुक्यांकरिता विद्युत विकासाची प्रलंबित कामे करण्याकरिता डोंगरी विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटण (जि.सातारा) या डोंगरी तालुक्यातील विद्युत विकासाच्या प्रलंबित कामांचा महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या सातारा विभागाचे अधिक्षक अभियंता यांनी सुमारे १८ कोटी रुपयांचा आराखडा तयार करून तो राज्य शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून या आराखड्याला कधी मंजुरी देण्यात येणार आहे,

(४) तसेच राज्य शासनाने पाटण या डोंगरी भागातील प्रलंबीत विद्युत विकासाच्या असलेल्या अडचणी लक्षात घेऊन या आराखड्याला तात्काळ मान्यता देणेसंदर्भात व निधी उपलब्ध करण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे, अद्यापही निर्णय घेतला गेला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून डोंगरी तालुक्याकरीता विद्युत विकास आराखडा तयार करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

पाटण या डोंगरी तालुक्यातील विद्युत विकासाच्या प्रलंबित कामांचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडून प्राप्त झाला असून तो विचाराधीन आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेमधून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षांचा व्याज परतावा मिळणेबाबत

(३२) * ६७१४५ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सहकार व पणन विभागाची डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना असून या योजनेअंतर्गत विकास सेवा संस्था, ग्रामीण बँका, राष्ट्रीयकृत बँका यांच्याकडून पिककर्ज घेणाऱ्या व त्यांची प्रतिवर्षी ३० जून पर्यंत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ही व्याज सवलत देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार १ लाखापर्यंतच्या पीक कर्जावरील वार्षिक १ टक्का दराने व्याज सवलत मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, पन्हाळा, गगनबावडा, शाहूवाडी, कागल, शिरोळ, गडहिंग्लज, राधानगरी व कोल्हापूर शहरामधून १० हजार ३०७ शेतकऱ्यांचे प्रस्ताव सन २०१३-१४ पासून प्रलंबीत असून व्याज परताव्याची रुपये २ कोटी ३३ लाख २४ हजार ४७१ रक्कम शासनाकडे थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर व्याज परताव्याची थकीत रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. सुभाष देशमुख : (१) होय, हे खरे आहे

(२) अंशत: खरे आहे

डॉ पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत पीक कर्जाची निर्धारीत मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु. १.०० लाखापर्यंत ३% व्याज सवलत दिली जाते

(३) अंशत: खरे आहे

सन २०१३-१४ या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुका वगळता सर्व तालुक्यामधून या योजनेंतर्गत एकूण १८५७२६ इतक्या शेतकऱ्यांचे २५२२४५८७८/- इतक्या रकमेचे प्रस्ताव राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, खाजगी बँका व कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त झाले. उपरोक्त सर्व प्रस्ताव मंजूर करुन प्राप्त निधीतून सभासद

शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे. पन्हाळा तालुक्यातील प्रस्ताव विहीत मुदतीत सादर झाले नाहीत. तथापि, सदर २१००१ शेतकऱ्यांचे रु. २७१६५७९४/- इतक्या रकमेचे प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात आले असून प्राप्त अनुदानातून सदर शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात येत आहे.

(४) पन्हाळा तालुक्यातील प्रलंबित प्रस्ताव तसेच सन २०१४-१५ करीता शेतकऱ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ मिळणेसाठी जिल्हाधिकारी, कोल्हापूर आणि सहकार आयुक्त व निबंधक पुणे यांचेकडे जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने निधी मागणी प्रस्ताव सादर केलेला आहे सदर अनुदान प्राप्त होताच सभासद शेतकऱ्यांना लाभ देण्यात येईल

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने पिकांना १२ तास वीज पुरवठा करण्याचा घेतलेला निर्णय

(३३) * ६५२९१ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाण्याअभावी पिकांचे नुकसान होवू नये म्हणून १२ तास विद्युत पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ६/९/२०१६ रोजी वा त्या सुमारास

घेऊनही ४० लाख कृषीपंपांना दिवासाचे बारा तास विद्युत पुरवठा करण्यात आला नसल्याचे व उक्त निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी ६०० कोटींच्या निधीची आवश्यकता असून सदर निधी उपलब्ध करण्यासाठी शासन कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) महावितरण कंपनीने दिनांक ८ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत केलेल्या वाढीव वीज पुरवठयासाठी अंदाजित रु. १२४४ कोटीची मागणी केली असून पुरवणी मागणीद्वारे सदर निधी उपलब्ध करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव जिल्ह्यात आधार कार्डाच्या नोंदणीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत झालेला गैरव्यवहार

(३४) * ६५१५० श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य),

श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात आधार कार्डाच्या नोंदणीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेतून आश्रमशाळांमध्ये हजेरी पटावर बोगस विद्यार्थ्यांची संख्या दाखवून मोठ्या प्रमाणात शासनाच्या निधीत गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्हयातील निवासी आश्रमशाळांच्या हजेरीपटावर असलेल्या २५ हजार ९२२ विद्यार्थ्यांपैकी सुमारे ८ हजार १७७ विद्यार्थ्यांचे फक्त कागदोपत्री अस्तित्व असून यापैकी अनेकजण मध्यप्रदेश वा शेजारच्या जिल्ह्यातील रहिवाशी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक सर्वेक्षणामध्ये सरकारी अनुदान प्राप्त ५५९ शाळांमधील ३० ते ४० टक्के विद्यार्थी बोगस दाखवून शासनाचे सुमारे ६८ कोटी रुपयांचे नुकसान करण्यात आले असून सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे तसेच बोगस विद्यार्थी दाखवून नुकसान झालेली रक्कम शासन कशी वसूल करणार आहे ?

श्री. विष्णु सवरा : (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी, जळगाव यांनी सर्व आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढणेसाठी दिनांक १३/८/२०१६ ते १७/८/२०१६ या कालावधीत सर्व आश्रमशाळांवर आधारकार्ड कॅम्प सुरु करण्यात आले. काही विद्यार्थ्यांचे आधारकार्ड १५ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पालकसभेत मुख्याध्यापकांकडे जमा केले, त्यावेळी आधारकार्ड न काढलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३५१८ एवढी निदर्शनास आली.

काही विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढण्यात न आल्याने जिल्हाधिकारी, जळगाव यांनी आधारकार्ड तपासणीसाठी पथक निर्माण करुन दिनांक २५/८/२०१६ रोजी तपासणी मोहीम राबवून त्याचा अहवाल सादर केला. सदर तपासणीमध्ये ५० आश्रमशाळेत ८१७७ विद्यार्थी गैरहजर आढळून आले आहेत.

या संदर्भात संस्थाचालकांकडून खुलासा मागविण्यात आला आहे. सदर खुलाश्यामध्ये शाळांनी सणामुळे विद्यार्थी गैरहजर असल्याचे दिलेले कारण लक्षात घेवून धुळे प्रकल्प कार्यालयातील विशेष पथकामार्फत शाळांची अचानक तपासणी सुरु केलेली आहे. सदर तपासणी अंती आलेल्या निष्कर्षानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येणार आहे.

राज्यातील आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये निकृष्ट दर्जाच्या गाद्यांचा पुरवठा होत असल्याबाबत

(३५) * ६५२८० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाचे तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४ रोजी राज्यातील आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांसाठी ३४ हजार ४३३ गाद्यांच्या खरेदीचा आदेश काढून त्यानुसार आश्रमशाळांसाठी १५ हजार ३०४ व वसतिगृहांसाठी १९ हजार १२९ काथ्याच्या गाद्यांची खरेदी शिवा इंटरनॅशनल या उनाव, उत्तर प्रदेश येथील कंपनीकडून रुपये ८ कोटी ५ लाख एवढ्या किंमतीला करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका गादीसाठी २ हजार ३३९ रुपये मोजल्याचे कागदपत्रात नमुद आहे, परंतु या गाद्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या असल्याने त्यातून धातूचे तुकडे आणि दगड बाहेर पडत असल्याची वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी तक्रार केली असल्याचे दि. ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याप्रकरणी गैरव्यवहार झाला असून याची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले तसेच दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१), (२) व (३) शासनाच्या तत्कालिन प्रचलित खरेदी धोरणानूसार कार्यवाही करून केंद्र शासनाच्या दर करारानुसार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या स्तरावरून शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतीगृहांना एकूण ३४४३३ नग गाद्यांचा पुरवठा करण्याबाबत पुरवठा आदेश शिवा इंटरनॅशनल, उनाव या पुरवठादारास देण्यात आला होता. सदर पुरवठादाराने पुरवठा आदेशात नमुद सर्व आश्रमशाळा व वसतीगृहांना गाद्यांचा पुरवठा पुर्ण केला आहे.

पुरवठा करण्यात आलेल्या गाद्यां निकृष्ट दर्जाच्या असल्याबाबत गाद्यांचा पुरवठा केलेल्या कोणत्याही आश्रमशाळेतील व वसतीगृहातील विद्यार्थ्यांची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सालेकसा (जि.गोंदिया) येथील आदिवासी भागात कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याबाबत

(३६) * ७०२६५ श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि. गोंदिया) येथील आदिवासी भागात कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांना दिनांक १० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) होय,

(२) व (३) सालेकसा जि.गोंदिया येथे कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याच्या मागणीबाबत कार्यवाही सुरु आहे.

राज्यात यंत्रमाग व हातमाग व्यावसायिकांच्या सुत व त्यावरील प्रक्रियेवर आकारला जाणारा अधिभार माफ करण्याबाबत

(३७) * ६५७०५ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः यंत्रमाग व हातमाग व्यावसायिकांच्या सुत व त्यावरील प्रक्रिया प्रकरणी जो अधिभार लावला जातो तो संपूर्णतः क्षमापित करावा अशी मागणी राज्यातील हातमाग/यंत्रमाग व्यावसायिकांनी मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (वस्त्रोद्योग) तसेच संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी तथा विभागीय महसूल आयुक्त, (कोकण, नाशिक, पुणे, नागपूर), तत्सम अधिकाऱ्यांकडे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने जनप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या हातमाग/यंत्रमाग संघटनेने सदर बाब वेळोवेळी संबंधित वस्त्रोद्योग विभागाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निष्पन्न झाले व त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आह,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) हे खरे नाही, परंतु यंत्रमाग व हातमाग व्यावसायिकांच्या सुत व त्यावरील प्रक्रिया प्रकरणी कोणताही अधिभार लावला जात नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूरसह सांगली जिल्हयातील महावितरणाच्या अनियमित कारभारामुळे २६८ जणांचा झालेला मृत्यू

(३८) * ६६४५२ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणाच्या अनियमित कारभारामुळे कोल्हापूरसह सांगली जिल्हयातील

२६८ जणांना जीव गमवावा लागला तर २१३ जणांना कायमचे अपंगत्व आल्याची बाब माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन जिल्हयातील गंजलेले खांब, तारा, सिमेंटचे पोल, फ्युज पेटया, केबलच्या डागडुजी या कामाकरिता कोल्हापूरच्या महावितरण कार्यालयाने मुंबई महावितरण कार्यालयाकडे सुमारे ९५ कोटींचा प्रस्ताव व जिल्हा नियोजन मंडळाकडे सुमारे १३ कोटीचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या प्रस्तावाबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) मुख्य विद्युत निरीक्षकांच्या अहवालानुसार एप्रिल, २०११ ते जुलै, २०१६ या कालावधीत कोल्हापूर व सांगली जिल्हयामध्ये एकूण २५९ प्राणांतिक व ३१७ अप्राणांतिक विद्युत अपघात झाले आहेत.

(२) यु एन्ड एम योजने अंतर्गत महावितरणतर्फे कोल्हापूर व सांगली जिल्हयाकरिता रु.१९.१० कोटी मंजूर झाले असून निविदा प्रक्रिया पुर्ण झाली आहे. कोल्हापूर जिल्हयाकरिता रु. १३ कोटीच्या प्रस्तावास जिल्हा नियोजन मंडळाकडून मंजुरी अप्राप्त आहे. तथापि, सांगली जिल्हयाकरिता रु. ८२.९९ लाखाच्या प्रस्तावास जिल्हा नियोजन समितीकडून सप्टेंबर, २०१६ मध्ये मान्यता मिळालेली आहे. जिल्हा नियोजन व विकास समितीकडून प्राप्त झालेल्या तरतुदीपोटी जुलै महिन्यामध्ये महावितरणतर्फे निविदा काढण्यात आल्या असून सदर कामाचे कार्यादेश सप्टेंबर, २०१६ मध्ये देण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अपंगांना अपंगत्व प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

(३९) * ६६३०७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २९ लाख अपंगांना अपंगत्व प्रमाणपत्र मिळण्यास विलंब

होत असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.मुख्यमंत्र्यांनी समाजकल्याण विभागाला अपंगत्व प्रमाणपत्र तात्काळ देण्याबाबतचे आदेश निर्गमित केले असतानाही संबंधित खात्याच्या अधिका-यांकडून जाणीवपूर्वक दूर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार अपंगांना तात्काळ अपंगत्व प्रमाणपत्र वितरित करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) नाही.

राज्यात संगणीकृत प्रणालीव्दारे दि.३ डिसेंबर, २०१२ ते दि. १ डिसेंबर, २०१६ या कालावधीत एकूण ४,६५,९०५ इतके अपंगत्व प्रमाणपत्रासाठी अर्ज प्राप्त झालेले असून त्यापैकी ३,५१,४९१ इतके अपंगत्व प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) राज्यात दि.३ डिसेंबर, २०१२ पासून अपंग प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीव्दारा देण्यास सुरुवात झाली. सद्य:स्थितीत राज्यात २५ जिल्हा रुग्णालये, ३ सामान्य रुग्णालये, १६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये, तसेच ३ उपजिल्हा रुग्णालये, २ ग्रामिण रुग्णालये, एक अस्थिव्यंग रुग्णालय, १ अली यावर जंग रुग्णालय व हाजी अली रुग्णालय मुंबई अशा ५२ संस्थेतून अपंगांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यात येतात.

राज्यातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक व उपसंचालक आरोग्य सेवा (सर्व) अपंगांना तातडीने प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत, विशेष मोहिम राबविण्याबाबत तसेच अपंग रुग्णांना योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयस्तरावरुन वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील साखर उद्योगाच्या एक हजार कोटी कर्जाचे पुनर्गठन करणेबाबत

(४०) * ६६९६२ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर उद्योग मोठ्या आर्थिक संकटात असून या उद्योगाला सावरण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने एक हजार कोटी कर्जाचे पुनर्गठन करावे अशी मागणी राज्य सहकारी साखर संघाने राज्य सरकारकडे केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील साखर उद्योग आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी एक हजार कोटी कर्जाचे पुनर्गठण करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) होय.

(२) व (३) मा.मंत्री समितीच्या दि.०३.१०.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने साखर संघाने कर्जाचे पुनर्गठन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव अप्राप्त आहे.

पाळा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील स्व.निंबाजी कोकरे आदिवासी आश्रमशाळेत अल्पवयीन मुलींवर झालेला अत्याचार

(४१) * ७१९७१ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील पाळा येथील स्व.निंबाजी कोकरे आदिवासी आश्रमशाळेत अल्पवयीन मुलींवर सामुहिक अत्याचार करुन लैगिंक

शोषण केल्याची घटना दिनांक २ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेतील सुमारे २० ते २५ मुलींवर या शाळेतील शिपाई आणि कर्मचाऱ्यांनीच अशाप्रकारचे अत्याचार केल्याचे निदर्शनास आले असून या प्रकरणी १२ जणांना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय तसेच खाजगी आश्रमशाळेतील सर्वच मुलींच्या सुरक्षिततेवर या घटनेमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अत्याचारग्रस्त पिडीत विद्यार्थीनीस आरोग्य तपासणीकरिता स्त्रीरोगतज्ञ नसल्याचे कारण सांगून दोन दिवस ताटकळत ठेवण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन या प्रकरणी चौकशी करणार आहे काय, त्यानुसार सदरील प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच राज्यातील सर्वच आश्रमशाळांची या प्रकरणी तपासणी करण्यात येऊन त्यात दोषी आढळणाऱ्या आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. सदर शाळेतील २० ते २५ मुलींवर शाळेतील शिपाई व इतर कर्मचारी यांनी अत्याचार केला, ही बाब सत्य नसून पोलीस अहवालानुसार तीन मुली पिडीत आहेत. सदर प्रकरणी मुख्य आरोपी इत्तुसिंग काळूसिंग पवार यासह अन्य ९ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी आठ स्थायी व दोन रोजंदारी तत्वावरील कर्मचारी आहेत. तसेच संस्थेच्या ८ पदाधिकाऱ्यांना देखिल चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

पोलीस स्टेशन हिवरखेड येथे दिनांक ३.१०.२०१६ रोजी सायंकाळी १८.३७ वाजता गुन्ह्यांची नोंद झाल्यानंतर लगेच पिडीत मुलीस व तिचे नातेवाईकांसह महिला सहायक पोलीस निरिक्षक यांनी वैद्यकिय तपासणी करिता सामान्य रुग्णालय, खामगांव येथे नेले असता, तिथे महिला अधिकारी नसल्याने, सदर मुलीस तपासणी करणेकरिता जिल्हा रुग्णालय, अकोला येथे पाठविले, वैद्यकिय

तपासणी पूर्ण करुन पिडीत मुलीस दिनांक ४.११.२०१६ रोजी खामगांव येथे परत आणण्यात आले आहे. पिडीत मुलीची वैद्यकिय तपासणी २४ तासाच्या आत करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी मुख्य आरोपी इत्तुसिंग काळूसिंग पवार वय २३ वर्ष यासह असे एकूण १० शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. प्रकल्प अधिकारी, अकोला यांनी शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी असे १२ कर्मचा-यांना आदेश क्र.७१२३, दिनांक ५.११.२०१६ अन्वये निलंबित केले आहे. तसेच प्रकल्प कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) व कनष्ठि शिक्षण विस्तार अधिकारी यांना दिनांक ५.११.२०१६ च्या आदेशानुसार निलंबित केलेले आहे.

(५) शासन परिपत्रक दिनांक ५.११.२०१६ अन्वये विभागातील सर्व आश्रमशाळा जिल्हाधिकारी यांचे मार्फत महिला अधिका-यांचे तपासणी पथक अनुदानित आश्रमशाळा व शासकीय आश्रमशाळेची तपासणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेवून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर प्रकरणी आयुकत, आदिवासी विकास, नाशिक यांच्या दिनांक ५.११.२०१६ अन्वये अनुदानित आश्रमशाळा, पाळा या शाळेची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शेतातील ऊस वाहतूकदारांना मुकादमाने फसविल्याबाबत

(४२) * ६७६१३ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस साखर कारखान्याकडे वाहून नेणाऱ्या ८७७ ट्रक व ट्रॅक्टरच्या मालकांची कारखान्यांच्या मुकादमाने सुमारे ५० कोटी रूपयांची फसवणूक केल्याची बाब दिनांक २० जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस तोडणी मुकादम व वाहतूकदार यांच्यातील किचकट स्वरूपातील बेकायदेशीर आणि मुद्रांक अधिनियमातील करारपत्र, शपथपत्र अथवा नोटीस व धनादेश हे एक वर्षानंतर कालबाह्य ठरविण्यात आल्याने ऊस वाहतूकदारांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याने ते आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत ऊस वाहतूक ट्रक-ट्रॅक्टर मालक संघाने मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी मा.सहकार मंत्री यांचेकडे दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.सहकार मंत्री यांचेकडे दिनांक २० जून, २०१६ रोजी वा त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ऊस वाहतूकदारांना फसविणाऱ्या मुकादमांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) होय.

(२) अशा स्वरुपाची तक्रार ऊस वाहतूकदार संघटनेकडून प्राप्त झाली आहे.

(३) होय. ऊस वाहतूक ट्रक व ट्रॅक्टरच्या मालक संघाने मा. मुख्यमंत्री यांचेकडे दि.१७.११.२०१५ रोजी व मा.श्री. राधाकृष्ण विखे -पाटील, विरोधी पक्षनेता यांनी मा. मंत्री (सहकार) यांचेकडे दि.२८.०६.२०१६ रोजी तक्रार केली आहे.

(४) व (५) अशाच प्रकारच्या तक्रारीच्या अनुषंगाने यापुर्वी साखर संघाने साखर कारखाना, ऊस वाहन धारक व ऊस तोडणी मुकादम यांच्यामध्ये त्रिस्तरीय करार करण्याची कार्यवाही सर्व सहकारी व खाजगी कारखान्यांच्या स्तरावर करावी, असे अभिप्राय दिनांक २३.०३.२०१४ रोजी दिले आहेत.त्यानुसार साखर आयुक्त, पुणे यांनी सर्व कारखान्यांना कार्यवाही करण्याच्या सूचना दि.०२.११.२०१६ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.सदर कार्यवाहीमुळे कामाची व यंत्रणेची हमी मिळेल व ऊस वाहतूक ट्रक- ट्रॅक्टर मालक यांचे तोडणी मुकादमाकडून होत असलेल्या फसवणूकीवर नियंत्रण राहील.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे हलकर्णी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील एमआयडीसीसाठी संपादीत केलेल्या शेतक-यांना संपादीत जमिनीऐवजी बदली जमिनी देण्याबाबत

(४३) * ७११३२ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हलकर्णी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील शेतक-यांच्या एमआयडीसीसाठी संपादित केलेल्या शेतक-यांना संपादित जमिनी ऐवजी बदली जमिन देण्याची मागणी चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी मा.उद्योग मंत्री यांचेकडे दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास अनेक वेळा करुनही बदली जमिनी देण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय,

(३) तसेच हलकर्णी एमआयडीसीसाठी संपादित केलेल्या शेतक-यांना संपादित जमिनी ऐवजी दुस-या जमिनी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१), (२) व (३) चंदगड येथील लोकप्रतिनिधी यांनी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास दि.२४/०८/२०१६ रोजी तपासून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि महामंडळाकडून अद्यापपर्यंत अहवाल प्राप्त झालेला नाही तरी महामंडळाकडून अहवाल प्राप्त होताच पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पन्हाळजे ते मुंबके (ता.खेड, जि.रत्नागिरी) परिसरातील अवैध मद्यव्यवसाय बंद करण्याबाबत

(४४) * ७०९६२ श्री.संजय कदम (दापोली) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळजे ते मुंबके (ता.खेड, जि.रत्नागिरी) परिसरातील सुमारे ११ गावांतील शेकडो ग्रामस्थांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास उत्पादन

शुल्क विभाग व पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन या परिसरात सुरु असलेले अवैध मद्यव्यवसाय तात्काळ बंद करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील खाडीपट्टी भागातील या अवैध मद्यव्यवसायाकडे स्थानिक अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून मागील अनेक वर्षांपासून दारुची अवैध विक्री सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे. तथापि, पन्हाळजे ते मुंबके परिसरातील दारुधंदे बंद करण्यासाठी बहुजन कार्यकारी मंडळ, खेड यांनी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खेड या कार्यालयास दि.२४.८.२०१६ रोजी दिलेल्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खेड यांनी मौ.राजवे, कदमवाडी, ता.खेड येथे दि.१६.११.२०१६ रोजी तर मौ. मुळगांव देऊळवाडी, ता. खेड येथे दि.१८.११.२०१६ रोजी केलेल्या कारवाईमध्ये २ इसमाना मुद्देमालासह अटक केली असून गुन्हे नोंदविले आहेत. या दोन्ही गुन्ह्यात एकूण रु.७२९२/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा (जि. पालघर) या तालुक्यातील ३० शासकीय शाळेत फलाहार बंद करण्यात आल्याबाबत

(४५) * ७१२४१ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जव्हार यांच्या अंतर्गत असलेल्या जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा या तालुक्यातील ३० शासकीय शाळेत निवासी शिक्षण घेत असलेल्या १७,५५३ विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या सफरचंद,

केळीचा फलाहार आदिवासी विकास आयुक्त, ठाणे यांच्या आदेशाने अचानक बंद केल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेला फलाहार बंद करण्याची कारणे काय आहेत व यासाठी पर्यायी कोणती व्यवस्था केली आहे,

(३) तसेच अद्यापही विद्यार्थ्यांचा सकाळच्या सकस आहारासंदर्भात कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही

अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे यांच्या अधिनस्त शासकिय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचा फलाहार बंद करण्याबाबत अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे यांनी कोणतेही आदेश दिलेले नसून फलाहार पुरवठा सुरळित सुरु आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल येथे उत्पादन शुल्क विभागाच्या अधिका-यांनी छापा टाकून मद्यसाठा जप्त केल्याबाबत

(४६) * ६६७२६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल येथे उत्पादन शुल्क विभागाच्या अधिका-यांनी छापा टाकून जवळपास २ कोटीचा मद्यसाठा दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पादन शुल्क विभागाच्या अधिका-यांनी केलेली सर्वात मोठी कारवाई असून यातील मुख्य आरोपीना अटक करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विदेशी दारु कुठे नेण्यात येत होती याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) अंशत: हे खरे आहे.

परंतु सदर मुद्येमालाची एकूण किंमत रु. १ कोटी ५ लाख ७३ हजार इतकी आहे.

(२) सदर प्रकरणी तपास सुरु असून सदर कारवाई ही मोठया कारवाईपैकी आहे. या प्रकरणी चौकशी करुन आरोपी विरुध्द गु.र.क्र.२४५/२०१६ दि.१८.०८.२०१६ रोजी नोंदविला आहे. सदर गुन्हयात अद्यापपर्यंत दोन इसमांना अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) व (४) सदर गुन्हयाच्या तपासात आरोपींनी सदर मद्य हे गोवा राज्यातून प्राप्त केले असून ते मद्य गुजरात व राजस्थान येथे नेत असल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

पेडगाव (ता.श्रीगोंदे, जि. अहमदनगर) हद्दीतील शंकरनगर ते अजनूज येथील महावितरणाच्या साहित्यांची चोरी झाल्याबाबत

(४७) * ६६८१५ श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदे (जि.अहमदनगर) तालुक्यातील पेडगाव हद्दीतील शंकरनगर ते अजनूज येथील महावितरणाच्या ११ के. व्ही. अजनूज लाईनच्या ३२ खांबांची डमी लाईन, वीज वाहक तारा व इतर अशा ९ लाख १७ हजार साहित्यांची चोरी झाल्याची तक्रार सहाय्यक अभियंता यांनी संबंधित पोलीस स्टेशनात दिल्याची माहिती दिनांक ४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे,

(३) तसेच दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

तथापि, चोरी झालेल्या साहित्याची किंमत घसारा वजा करुन रु.१,१७,०००/- इतकी आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशनमध्ये दि.३०.८.२०१६ रोजी गु.र.क्र.५४४/२०१६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत अनियमितता होत असल्याबाबत

(४८) * ६५०८२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मध्ये संस्था चालक व सरकारी अधिकारी अनियमितता करीत असल्याने विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरुन घेऊन शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय सहा वर्षापूर्वी घेण्यत आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार या कामाचे कंत्राट मास्टेक या कंपनीला दिनांक २५ ऑक्टोंबर, २०१० रोजी देऊन सदर कंपनीकडून शिष्यवृत्तीचे अर्ज भरणे, वसतीगृहात प्रवेश देणे, अर्ज मंजूर करणे, अर्ज समाजकल्याण विभागाकडे पाठविणे इ. कामे करुन घेण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा मास्टेक कंपनी सोबतचा सरकारचा करार जून, २०१६ मध्ये संपला असून, नवीन करार न केल्यामुळे कंपनीने आपली वेबसाईट बंद केली असल्याने विद्यार्थ्यांना त्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करता येत नसल्याची बाब माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाखो मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर आर्थिक भार पडत असल्याने त्यांना शिक्षण सोडावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फ्री शिप देण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) अंशत: होय, शिष्यवृत्ती तसेच शिक्षण फी, परीक्षा फी या योजनांमध्ये एकसुत्रता, अचुकता, पारदर्शकता आणून विलंब टाळण्यासाठी राज्यशासनाने सन २०११ ई-स्कॉलशीप योजना कार्यान्वित केलेली असून त्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या बँक खात्यावर व शिक्षण फी परीक्षा फी संबंधित शिक्षण संस्थेच्या खात्यावर ऑनलाईनद्वारे जमा केली जाते.

(२) होय.

(३) मे. मास्टेक कंपनीचा शासनासोबतचा करार जून २०१६ मध्ये संपला आहे. परंतु विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून मे. मास्टेक कंपनीमार्फत ई-स्कॉलरशीप संगणक प्रणालीचे काम चालू ठेवण्याच्या कामास दिनांक ३० एप्रिल २०१७ पर्यंत किंवा राज्य शासनामार्फत (माहिती व तंत्रज्ञान विभाग) शिष्यवृत्तीसाठी प्रस्तावित असलेली संगणक प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत जे आधी घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दादर, मुंबई येथील सीकेपी बँकेत गैरव्यवहार केलेल्या संचालकांवर कारवाई करण्याबाबत

(४९) * ६५४२३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर),

श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथील सीकेपी बँकेत तब्बल ८५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीकेपी बँकेच्या तत्कालीन संचालक मंडळाने बँकेचे नियमबाह्य कर्जवाटप केले पण कर्जवसूलीकडे दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकाराची सखोल चौकशी करुन दोषी आढळणा-यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) होय.

(२) बँकेच्या सन २०११-१२ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार बँकेच्या संचालक मंडळाने कर्ज वसुलीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

(३) विशेष लेखापरिक्षक, वर्ग-२, सहकारी संस्था, मुंबई यांनी बँकेच्या रु.८५.४९ कोटी आर्थिक नुकसानीस तत्कालीन अध्यक्ष, संचालक मंडळ व जनरल मॅनेजर जबाबदार असल्याने एकूण २३ व्यक्तींवर दि.२२.०८.२०१६ रोजी शिवाजी पार्क पोलिस ठाणे मुंबई येथे भा.द.वि. कलम ४०९,३४ अन्वये एफआयआर क्र.२६८/१६ दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कांद्याला आधारभूत किंमत देण्याबाबत

(५०) * ६५०८३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण),

डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उन्हाळी कांद्याचा उत्पादन खर्च प्रति क्विंटलला ९०० रुपये, सहा महिने कांदा चाळीत ठेवल्याने वजनातील घट, सडणे, भावांची घसरण, मजुरी, वाहतूकीचा वाढलेला खर्च प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या हातात केवळ ४०० रुपये प्रति क्विंटल पडत असून शिल्लक राहिलेल्या पाच लाख टन कांद्याचा विचार करता ७०० कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याची बाब ९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास सटाणा बाजार समितीमध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील ७०% कांद्याचे पिक घेणा-या लासलगाव परिसरात कांद्याच्या साठवणूकीच्या सुविधांअभावी कांद्याचे भाव ४ रुपये किलो पर्यन्त कमी झाले असून कांद्याचे नवे पिक येणार असल्याने हे दर आणखी कमी होण्याची शक्यता निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ९ सप्टेंबर, २०१६ रोजी सटाणा बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या एक हजार ट्रॅक्टर कांदा खराब असल्याचे कारण सांगून लिलाव होणार नसल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी अडीच तास रस्ता रोको आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कांदा उत्पादकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच कांदा साठवणूक, कांदा प्रक्रिया सुविधेत वाढ करण्याबरोबरच कांद्याला आधारभूत किंमत देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) व (२) नाही.
(३), (४) व (५) दिनांक ०९/०९/२०१६ रोजी शेतक-यांनी केलेल्या रास्ता रोको आंदोलनाच्या अनुषंगाने तहसिलदार, बागलाण सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व पोलीस निरिक्षक सटाणा यांनी सटाणा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात प्रत्यक्ष उपस्थित राहून चौकशी केल्यानंतर समोर आलेली वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

दिनांक ०९/०९/२०१६ रोजी सटाणा बाजार समितीच्या आवारात सुमारे १०५० वाहने कांदा विक्रीसाठी आलेली होती सुरवातीस ४५ वाहनामधील १३५० क्विंटल कांद्याचा लिलाव झाल्यानंतर एक-दोन वाहनामध्ये अत्यंत हलक्या प्रतीचा सडका कांदा असल्याने विक्रीसाठी प्रथमत: व्यापा-यानी लिलाव करण्यास नकार दिला तथापि शेतक-यांच्या आग्रहास्तव व बाजार समितीच्या सांगण्यानुसार सदर कांद्यासाठी रुपये २५ प्रमाणे बोली लागल्याने शेतक-यांनी कांदा गेटसमोर टाकून रस्त्यावरती आंदोलन केले. सदर वस्तुस्थिती आंदोलन करणा-या शेतक-यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर उर्वरित कांदा लिलावाचे काम सुरळीतपणे सुरु होऊन १००५ वाहनामधील १६८८४ क्विंटल कांद्याचे लिलाव होऊन कांद्याला किमान १८० व कमाल ६५१ आणि सरासरी ५२५ इतका बाजार भाव मिळाला.
(६) कांदा साठवणुकीसाठी सन २०१५-१६ पर्यंत वेगवेगळ्या योजनाअंतर्गत एकूण ८११२ कांदाचाळी अंतर्गत १८०४४९ मे.टन क्षमता निर्माण झालेली आहे. तसेच नव्याने ७०७२५ मे.टन क्षमतेचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

किमान आधारभूत किंमत केंद्र शासनाकडून जाहीर केली जाते राज्य शासनाकडून कांद्याला किमान आधारभूत हमीसाठी शिफारस केली जाते.तथापि कांदा हे नाशवंत पिक असल्याने केंद्रशासनाकडून कांद्यासाठी किमान आधारभूत किंमत जाहीर केली जात नाही.

राज्यातील संस्थांनी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती शुल्कात गैरव्यवहार केल्याबाबत

(५१) * ६५५९९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नितेश राणे (कणकवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ संस्थांनी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून वाटण्यात आलेल्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती /शैक्षणिक शुल्कातील सुमारे १२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे राज्यशासनाने नेमलेल्या विशेष चौकशी पथकाने केलेल्या चौकशीत निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण आयुक्तांना सदर १५ संस्थांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश सामाजिक न्याय विभागाने दिले असल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थांकडून ही रक्कम वसूल करणेबाबत आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय तसेच आतापर्यंत किती संस्थाकडून रक्कम वसूल करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) व (२) होय,

राज्यातील १५ संस्थांनी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती / शैक्षणिक शुल्काच्या एकूण रु.११.७४ कोटी इतक्या रकमेचा अपहार केल्याचे विशेष चौकशी पथकाने केलेल्या चौकशीत आढळून आल्याने, संबंधित संस्था चालकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे व सदर रक्कम वसुल करण्याचे निर्देश आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांना देण्यात आलेले आहेत.

(३) व (४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी संबंधित संस्थांवर गुन्हे दाखल करण्याच्या तसेच वसूलपात्र रक्कम वसूल करण्याच्या सूचना संबंधित जिल्हयांचे सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना दिलेल्या आहेत. त्यानुसार आतापर्यंत एकूण ८ संस्थांकडून रक्कम वसूल करण्यात आली असून उर्वरित रकमेच्या वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.